RTE GR

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१.

क्रमांक : २/एनजीपी [मॅनजेमेंट]/१०२४/अी३५४०

दिनांक : 24 AUG 1994

प्रति,

प्राचार्य,
विवेकानंद एज्यूकेशन सोसायटी,
चेंबूर, मुंबई.

विषय: राज्यातील खाजगी संस्थांना कायम विनाअनुदान तत्वावर विद्यपिठ कायदा कलम ४३ [४] अन्वये अनुमती देण्याबाबत...

संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद पत्र क्रमांक: एफ-२७-१७-बी-२/बीओएस [एम] ९४/२३३७३, दिनांक ३१. ३. ९४

उपरोक्त विषयाचे संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, शासनाने शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाचे पत्र क्रमांक: एनजीसी ३६९४/एमबीए ७४६५/मशि-३, दिनांक १९ मे, १९९४ अन्वये आपल्या संस्थेला खालील दिल्या-प्रमाणे अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी काही अटींच्या व शर्तींच्या अधिन राहून दिलेली आहे.

| परवानगी दिलेले अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | ठिकाण | कालावधी |
|---|---|---|---|
| १] एम. एम. एस. [द्विवर्षीय पूर्णवेळ] | ६० | मुंबई | १९९४-९५ व १९९५-९६ |

सदर अटींपैकी एक अट अशी आहे की, संस्थेने संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण यांचे संयुक्त खात्यात नियतठेव म्हणून रुपये दोन लक्ष जमा करणे आवश्यक आहे. व सदर नियतठेवीची मूळ पावती या संचालनालयाकडे जमा करणे आवश्यक आहे.

सदर नियतठेवीची मूळ पावती या संचालनालयाकडे जमा केल्याखेरीज आपणास मॅनेजमेंट अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतची अंतिम मान्यता देता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

[ ओ. एस. बिहाडे ]
उपसंचालक, तंत्रशिक्षण, म. रा. मुंबई.

प्रत माहितीसाठी सादर.

१] सचिव, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग , मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सादर.